दैनिक
समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकारांचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ७ वे अंक – ६३ मंगळवार दि.१० नोव्हेंबर २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४
Beed Daily Marathi Year-7th Issue-63 Tuesday, Dt.10 November 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

दुष्काळाच्या काळोखात मुख्यमंत्र्यांची शेतकऱ्यांच्या बांधावर दिवाळी.!

शेतकऱ्यांच्या घरी मुक्काम, चटणी-भाकरीचा आस्वाद अन् संकटमुक्तीचा विश्वास १० शेतकऱ्यांना सिंचन विहिरी, २.४३ कोटींच्या साठवण तलावाची घोषणा







नागपूर । प्रतिनिधी

दुष्काळाच्या झळांनी शेतकरी हवालदिल असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यंदाची दिवाळी नागपूर जिल्ह्यातील नरखेड तालुक्यातील लोहारी सावंगा येथे शेतकरी कुटुंबांसोबत साजरी केली. ७ नोव्हेंबर रोजी गावात मुक्काम करून शेतकरी रामभाऊ बालपांडे यांच्या घरी चटणी-भाकरीचे भोजन घेतले, ग्रामस्थांशी संवाद साधला आणि ८ नोव्हेंबर रोजी प्रत्यक्ष शेतात जाऊन नुकसानग्रस्त पिकांची पाहणी केली. केवळ आश्वासन न देता पाणी, सिंचन आणि पशुधनाच्या प्रश्नांवर उपाययोजनांची ग्वाही देत त्यांनी शेतकऱ्यांना दिलासा दिला.

मुख्यमंत्र्यांसोबत महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार चरणसिंह ठाकूर, आशिष देशमुख, डॉ. राजीव पोतदार, माजी आमदार सुधाकर कोहळे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी तसेच सरपंच सतीश चापले यांच्यासह लोकप्रतिनिधी व अधिकारी उपस्थित होते.

१० शेतकऱ्यांना सिंचन विहिरी, २४३.३५ लाखांचा साठवण तलाव

लोहारी सावंगा येथे सिंचन विहीर योजनेंतर्गत दहा शेतकऱ्यांना विहिरी मंजूर करण्यात आल्या. लाभार्थ्यांमध्ये विमल शामराव खडगा, सुमन रामभाऊ थापले, रामचंद्र मधुकर घोडे, मेघनाथ भिमराव राऊत, खुशाल महादेव बरडे, धनराज सदाशिव वैद्य, तेजराव नथुजी फंदी, संध्याताई मनोहर राऊत, रमेश चंपत काळे आणि दानीश खान हनिफ पठाण यांचा समावेश आहे.तसेच गावात २४३.३५ लाख रुपये खर्चाच्या साठवण तलावाचे बांधकाम करण्याची घोषणा करण्यात आली. या प्रकल्पामुळे सिंचनासह भूजलपातळी वाढण्यास आणि भविष्यातील पाणीटंचाई कमी करण्यास मदत होण्याची अपेक्षा आहे.

ब्लॅकमेल करणारा कोणीही असो त्याला तुरुंगाची हवा...

पत्रकार असल्याचे सांगून काही व्यक्ती महिला सरपंचांकडे पैशांची मागणी करीत असल्याची तक्रार यावेळी करण्यात आली. अशा प्रकारे ब्लॅकमेलिंग करणाऱ्यांवर कारवाई करून तुरुंगात टाकण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी पोलिस विभागाला दिले.

१५ डिसेंबरपर्यंत विंधन विहिरींच्या बंदीला शिथिलता

दुष्काळी परिस्थिती लक्षात घेऊन झाडे जगविण्यासाठी आवश्यक त्या ठिकाणी शेतीकामाकरिता विंधन विहिरी घेण्यावरील बंदी १५ डिसेंबरपर्यंत शिथिल करण्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली. यासाठी परवानगी आवश्यक असून निर्णय सरसकट लागू नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पाणी बचत आणि पुनर्भरणाचे आवाहनही त्यांनी केले.

चारा, पाणी, पशुवैद्यकीय सेवा आणि जलसंधारणाला प्राधान्य

ग्रामपंचायत प्रतिनिधींशी संवाद साधताना पिण्याचे पाणी, जनावरांचा चारा, पशुवैद्यकीय दवाखाने आणि अपूर्ण जलजीवन मिशनच्या कामांचे प्रश्न मांडण्यात आले. गाळमुक्त धरण, जलयुक्त शिवार आणि अटल भूजल योजनेची कामे प्राधान्याने पूर्ण करण्याची ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली. ७५ टक्क्यांपेक्षा अधिक पूर्ण झालेल्या जलजीवन मिशनच्या कामांना निधी उपलब्ध करून देण्याचेही त्यांनी सांगितले.

वन्यप्राण्यांमुळे शेतीचे होणारे नुकसान रोखण्यासाठी तार कुंपण योजना व्यापक करण्याचे, जंगलालगतच्या शेतांना प्राधान्य देण्याचे तसेच पशुवैद्यकीय दवाखान्यांबाबत तातडीने पाहणी करण्याचे निर्देश त्यांनी दिले. खोरी प्रकल्प, ४३ वर्षांपासून प्रलंबित पाझर तलाव आणि जलसंधारणाच्या कामांबाबतही सकारात्मक कार्यवाहीचे आश्वासन दिले.

लाडक्या बहिणींच्या चेहऱ्यावर आनंद, गावकऱ्यांसाठी अविस्मरणीय दिवाळी

मुख्यमंत्र्यांनी आपल्या गावात मुक्काम केल्याने लोहारी सावंगातील महिलांनी आनंद व्यक्त केला. आजवर प्रत्यक्ष मुख्यमंत्री पाहिला नव्हता, ते आमच्या गावात आले, आमच्यासोबत दिवाळी साजरी केली, ही आमच्यासाठी मोठी भाऊबीज भेट असल्याची भावना महिलांनी व्यक्त केली.

मुख्यमंत्री गुरुदेव सेवा मंडळाच्या प्रार्थनासभेतही सहभागी झाले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांचा जागर करणाऱ्या या सभेत गुरुकुंज मोझरीच्या भजन मंडळाने भजने सादर केली. यावेळी अमोल बांबल, शितल मांडवगडे, गजानन गायकवाड, चेतन अंभोरे, सागर भालचक्र, आकाश वानखडे आणि श्रावण सोनटक्के यांनी भजनसेवा केली.

शेतकऱ्यांसाठी मदत आणि मुख्यमंत्री सहायता कक्ष..

मुख्यमंत्र्यांनी दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना आर्थिक मदत, पिण्याचे पाणी आणि जनावरांसाठी चारा उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नांची माहिती दिली. नियमित कर्जफेड करणाऱ्या १८ लाख शेतकऱ्यांना प्रत्येकी ५० हजार रुपयांचे सानुग्रह अनुदान देण्याबाबतही त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांच्या खात्यात पाच हजार रुपये जमा करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे नमूद केले. याशिवाय तालुकास्तरावर मुख्यमंत्री सहायता कक्ष सुरू करण्याची घोषणा केली.

दुष्काळाच्या संकटात शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचून त्यांच्या अडचणी ऐकणे, त्यांच्या घरात भोजन करणे आणि गावात मुक्काम करणे, या कृतीमुळे लोहारी सावंगातील ग्रामस्थांसाठी यंदाची दिवाळी संस्मरणीय ठरली. संकटाच्या काळात शेतकऱ्यांना केवळ दिलासा नव्हे, तर कायमस्वरूपी पाणी आणि शेतीला आधार देणाऱ्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, हीच आता शेतकऱ्यांची अपेक्षा आहे.

ऊसतोड कामगारांच्या चिमुरडीच्या दुर्दैवी मृत्यूने डॉ. नीलमताई गोऱ्हे व्यथित, कुटुंबीयांशी संवाद साधत दिला मदतीचा विश्वास.!

ॲड. संगीताताई चव्हाण यांनी घटनास्थळी भेट देत प्रकरणाची माहिती डॉ. गोऱ्हे यांच्यापर्यंत पोहोचवली

बीड प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील ठाकरवाडी तांडा, उमापूर रोड येथे ९ वर्षीय बालिकेचा झालेला दुर्दैवी मृत्यू मन हेलावून टाकणारा आहे. या घटनेची विधान परिषदेच्या माजी उपसभापती तथा शिवसेना नेत्या मा. आ. डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी गंभीर दखल घेतली असून, बालिकेच्या कुटुंबीयांशी दूरध्वनीद्वारे संवाद साधत त्यांचे सांत्वन केले. तसेच या प्रकरणातील सत्य समोर आणण्यासाठी आणि कुटुंबीयांना आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.



बालिकेचे आई-वडील ऊसतोडणीच्या कामानिमित्त कर्नाटक राज्यात गेलेले असल्याने ती आपल्या आजी-आजोबांसोबत राहत होती. या घटनेची माहिती मिळताच शिवसेनेच्या मराठवाडा महिला संपर्कप्रमुख तथा महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या माजी सदस्या ॲड. संगीताताई चव्हाण यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन परिस्थितीची माहिती घेतली.यावेळी ॲड. संगीताताई चव्हाण यांनी डॉ. नीलमताई गोऱ्हे यांच्याशी संपर्क साधून घटनेचा संपूर्ण तपशील त्यांच्या निदर्शनास आणून दिला. त्यानंतर डॉ. गोऱ्हे यांनी स्वतः बालिकेच्या आजोबांशी व कुटुंबीयांशी दूरध्वनीद्वारे संवाद साधला. दुःखाच्या या प्रसंगी कुटुंबीयांना धीर देत, बालिकेच्या मृत्यूचे नेमके कारण आणि संपूर्ण घटनाक्रम तपासातून स्पष्ट होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकरणात कुटुंबीयांना न्याय मिळावा आणि आवश्यक ती मदत उपलब्ध व्हावी यासाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.प्राथमिक माहितीनुसार, शवविच्छेदन अहवालात लैंगिक अत्याचार झाल्याचे निष्पन्न झालेले नाही. मात्र, बालिकेच्या मृत्यूचे नेमके कारण आणि घटनेमागील सर्व बाबींचा उलगडा निष्पक्ष व सखोल तपासातून होणे गरजेचे आहे.

दरम्यान, घटनास्थळी डीवायएसपी खटके व गेवराईचे तहसीलदार उपस्थित होते. अतिरिक्त पोलीस अधीक्षक यांनीही घटनास्थळाची पाहणी केली. यावेळी ॲड. संगीताताई चव्हाण यांच्यासमवेत शिवसेना बीड समन्वयक प्रतिभा गणोरकर, शिवसेना गेवराई समन्वयक शकुंतलाताई घुंगासे, शिवसेना गेवराई उपजिल्हाप्रमुख मनीषाताई शरणागत, प्रवीण जाधव, सरपंच तसेच ठाकरवाडी तांड्यावरील स्थानिक नागरिक उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी सामाजिक दयित्व जोपासावे - जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

अंबाजोगाई प्रतिनिधी : उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी आपण कुठल्याही क्षेत्रात गेलात तरी सामाजिक दाईत्व जोपासण्यास विसयू नका अशी अपेक्षा बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी शनिवारी (दि.७) येथे व्यक्त केली. संत गाडगेबाब सेवाभावी संस्थांतर्गत आधार माणुसकीच्या उपक्रमातर्फे बीडसह लातूर, धाराशिव व परभणी जिल्ह्यातील ११०० गरीब व गरजू कुटुंबांना दिवाळीचा फराळ व माहेरची साडी भेट देण्यात आली. त्याप्रसंगी विवेक जॉन्सन बोलत होते. अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर हे होते. शोभा बाबु खडकभावी, प्रा. रोहिणी पाठक, लातूरच्या स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. निहारीका नागरगोजे, आदर्श शिक्षिका शितल बोधले, अर्चना सुनिल सोळंके, रजनी प्रवीण देशमुख, रुपाली काकडे, मोनिका मुंदडा, स्वाती चेतन मोदी यांची उपस्थिती होती.



महिलांनी शासनाच्या बचत गटाच्या माध्यमातून आर्थिक साक्षर व्हावे. कोणताही व्यवसाय हा छोटा नसतो. तो जिद्द व चिकाटीने करा. जिथे अडचण येईल. तिथे प्रशासन तुमच्या पाठीशी आहे. तुम्ही आत्मनिर्भर व्हा. असे सांगून भविष्यात ऊसतोड कामगारांची भावी पिढी शिक्षणातून पुढे आली पाहिजे. ग्रामीण भागातील मुलांनी न्यूनगंड न बाळगता शिक्षणात पुढे यावे. आधार माणुसकीच्या उपक्रमाचे त्यांनी कौतुक केले.

अध्यक्षीय समारोपात चंद्रशेखर बर्दापूरकर म्हणाले की, माणूस जोडला की देश आपोआप जोडला जाईल. यासाठी समाजातील उपेक्षितांसाठी काम करता आले पाहिजे. आधार माणुसकीच्या उपक्रमांतून आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा पत्नी व आर्थीक परिस्थितीने कमकुवत विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून त्यांचा आधार बनले आहेत. अशा संस्थांनी आपले पालकत्व घेतले असले तरी आपण पालकांनीही सक्षम व्हावे अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

यावेळी डॉ. निहारीका नागरगोजे, प्रा.रोहिणी पाठक यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक आधार माणुसकीच्या उपक्रमाचे प्रमुख ॲड. संतोष पवार यांनी केले. सूत्रसंचालन शिवानंद गुळवे यांनी केले. प्रशांत बर्दापूरकर यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी रामकृष्ण पवार, चंद्रशेखर शिंदे, रवींद्र लोमटे, बळीराम जोगदंड, अनंत निकते, बंडू जांभळे, धनराज पवार, संजय सुरवसे, वैभव सूर्यवंशी, राहुल शिंदे यांच्यासह आधार माणुसकीच्या परिवारातील सदस्यांनी पुढाकार घेतला.

'१०२' रुग्णवाहिका सेवेत नांदेड जिल्ह्यात हिमायतनगरचा प्रथम क्रमांक.! आरोग्यमंत्र्यांच्या ऐतिहासिक भेटीनंतर उपजिल्हा रुग्णालयाचा चेहरामोहरा बदलणार

हिमायतनगर प्रतिनिधी : नांदेड जिल्ह्यातील '१०२' रुग्णवाहिका सेवेमध्ये हिमायतनगरने प्रथम क्रमांक मिळवून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. ही बाब संपूर्ण हिमायतनगर तालुक्यासाठी अभिमानास्पद असून, आरोग्य सेवेच्या क्षेत्रात शहराने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.

विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वी राज्याचे आरोग्यमंत्री ना. प्रकाश आबिटकर यांनी स्वतः हिमायतनगर येथील उपजिल्हा रुग्णालयाला भेट देऊन आरोग्यविषयक समस्या जाणून घेतल्या. हिमायतनगरच्या इतिहासात प्रथमच आरोग्यमंत्र्यांनी प्रत्यक्ष उपजिल्हा रुग्णालयात येऊन पाहणी केल्याने या भेटीला ऐतिहासिक महत्त्व प्राप्त झाले आहे. या महत्त्वपूर्ण दौऱ्यामागे हदगाव-हिमायतनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाबूराव कदम कोहळीकर यांचे सातत्यपूर्ण प्रयत्न आणि पाठपुरावा महत्त्वाचा ठरला. त्यांनी हिमायतनगरच्या आरोग्यविषयक प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधून आरोग्यमंत्र्यांना येथे आणण्यासाठी विशेष प्रयत्न केले. त्यांच्या पुढाकारामुळे हिमायतनगरच्या आरोग्य समस्यांना शासनदरबारी महत्त्व प्राप्त झाले आहे.

आरोग्यमंत्र्यांच्या भेटीनंतर हिमायतनगरच्या उपजिल्हा रुग्णालयात महत्त्वपूर्ण आरोग्य सुविधा उपलब्ध होण्याची अपेक्षा निर्माण झाली आहे. यामध्ये



महिलांसाठी प्रसूतीची सुविधा, सोनोग्राफी तपासणी, एक्स-रे सुविधा तसेच विविध प्रकारच्या रक्त तपासण्या रुग्णालयातच उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने प्रयत्न होणार आहेत. या सुविधा सुरू झाल्यास गर्भवती महिलांना आणि सर्वसामान्य रुग्णांना छोट्या-मोठ्या तपासण्यांसाठी नांदेड किंवा इतर शहरांकडे धाव घेण्याची गरज राहणार नाही. विशेषतः ग्रामीण भागातील गरीब आणि गरजू रुग्णांना याचा मोठा दिलासा मिळणार आहे.

केवळ वैद्यकीय सुविधाच नव्हे, तर हिमायतनगर उपजिल्हा रुग्णालयाचा चेहरामोहरा बदलण्यासाठीही आरोग्यमंत्र्यांकडून विशेष बजेट उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक भूमिका समोर आली आहे. या निधीतून रुग्णालयाचे सुशोभीकरण, आवश्यक दुरुस्ती, रुग्णांसाठी चांगल्या सुविधा आणि आरोग्य व्यवस्थेचा दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने कामे होण्याची अपेक्षा आहे.

एकीकडे '१०२' रुग्णवाहिका सेवेत जिल्ह्यात प्रथम क्रमांक, तर दुसरीकडे आरोग्यमंत्र्यांची ऐतिहासिक भेट आणि उपजिल्हा रुग्णालयासाठी अत्याधुनिक सुविधांची अपेक्षा, यामुळे हिमायतनगरच्या आरोग्य क्षेत्राला नवी दिशा मिळण्याची चिन्हे आहेत.

आमदार बाबूराव कदम कोहळीकर यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हिमायतनगरच्या आरोग्यविषयक प्रश्नांना शासनाचे लक्ष मिळाले आहे. आता या आश्वासनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होऊन सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा मिळाव्यात, हीच हिमायतनगरच्या जनतेची अपेक्षा आहे.

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)
संपादकीय
मंगळवार दि. १० नोव्हेंबर २०२६
Tuesday, Dt. 10 November 2026
पान -२
PAGE - 2

संपादकीय

दिवाळीचा पाडवा गोडव्याचा... पण दुष्काळाच्या सावटाखाली.!

बीड - दिवाळी पाडवा म्हणजे नात्यांमधील गोडवा, समृद्धीची अपेक्षा आणि नव्या आशेची सुरुवात! मात्र यंदा बीडसह संपूर्ण मराठवाड्यातील अनेक भागांत दिवाळीचा आनंद दुष्काळाच्या सावटाखाली आहे. पावसाने ओढ दिल्याने जमिनीतील पाणीसाठे घटत आहेत, विहिरींची पातळी खालावत आहे आणि शेतकऱ्यांच्या डोळ्यांसमोर पुढील उन्हाळ्याचे संकट उभे राहत आहे. आज पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आहे, उद्या जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न अधिक तीव्र होईल. शेतीला पाणी नाही, हाताला काम नाही आणि जनावरांना चारा नाही, अशी परिस्थिती निर्माण झाली तर ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मोडण्यास वेळ लागणार नाही.

दुष्काळ हा अचानक येत नाही त्याची चाहूल निसर्ग आधीच देत असतो. प्रश्न एवढाच आहे की, प्रशासन आणि सरकार त्या इशाऱ्यांकडे किती गांभीर्याने पाहते.?

सरकारने दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी बैठका घेणे, आकडेवारी मागवणे आणि पंचनामे करणे आवश्यकच आहे. परंतु केवळ कागदोपत्री आढाव्याने तहानलेल्या गावांना पाणी मिळणार नाही. टँकर, चारा छावण्या, रोजगार हमीची कामे, पाणीपुरवठा आणि पीक नुकसानीची मदत याबाबत ठोस नियोजन जमिनीवर उतरले पाहिजे. आजच पाण्याचे नियोजन झाले नाही, तर उद्याचा उन्हाळा गावागावांसाठी कठीण परीक्षा ठरू शकतो.

शेतकऱ्यांसाठी केवळ पीक विम्याच्या घोषणा पुरेशा नाहीत. नुकसानग्रस्तांना वेळेत आर्थिक मदत, जनावरांसाठी चारा, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि मजुरांच्या हाताला रोजगार मिळणे गरजेचे आहे. दुष्काळाच्या काळात मदत ही उपकाराची बाब नसून संकटग्रस्त जनतेचा हक्क आहे.मात्र सरकारसोबतच जनतेची जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे.

पाण्याचा प्रत्येक थेंब जपणे, अनावश्यक पाणीवापर टाळणे, शेततळी आणि जलसंधारणाच्या कामांना प्राधान्य देणे ही काळाची गरज आहे. आज पाणी वाचवले तरच उद्या पाणी जगवता येईल.

दिवाळीच्या पाडव्याला घराघरांत गोडधोड होईल, पण ज्याच्या शेतात पिके करपली आहेत, ज्याच्या गोठ्यातील जनावरांसाठी चारा नाही आणि ज्याच्या गावात पिण्याच्या पाण्याची चिंता आहे, त्याच्यासाठी दिवाळीचा खरा आनंद म्हणजे सरकारकडून मिळणारा दिलासा.!

सरकारने आता आश्वासनांचा प्रकाश न दाखवता प्रत्यक्ष मदतीचा दिवा पेटवावा. कारण दुष्काळाच्या झळा भाषणांनी कमी होत नाहीत आणि तहानलेल्या माणसाची तहान घोषणांनी भागत नाही.

यंदाचा दिवाळी पाडवा एकच संदेश देत आहे... आज पाणी वाचवा, उद्याचे जीवन वाचवा.! सरकारने जागे व्हावे आणि जनतेनेही जलसंवर्धनासाठी पुढाकार घ्यावा. कारण पाणी असेल तर शेती असेल, शेती असेल तर शेतकरी टिकेल आणि शेतकरी टिकला तरच ग्रामीण महाराष्ट्राचे भविष्य टिकेल.!

दुष्काळ उद्याचे संकट नाही, तो आजच आपल्या दारात उभा आहे. सरकारने हे वास्तव ओळखावे. अन्यथा येणारा उन्हाळा केवळ तापमानाची नव्हे, तर व्यवस्थेच्या नियोजनाचीही परीक्षा घेणार आहे!

दैनिक समर्थ राजयोग । विशेष अग्रलेख

पदाचा रुबाब नाही, सत्तेचा माज नाही... गरजवंतांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणारे जावेद भैय्या कुरेशी ठरताहेत माणुसकीचा खरा आधार.!

दिवाळीच्या रोषणाईत गरिबांच्या घरात आनंदाचा दीप पेटवणारा समाजसेवक, शेकडो महिलांना जीवनावश्यक वस्तूंच्या किटचे वाटप, निस्वार्थ सेवेची पंचक्रोशीत चर्चा..!!





राजकीय बंगल्यांच्या दारापेक्षा माणुसकीच्या उंबरठ्यावर गर्दी अधिक.!

बीड । प्रतिनिधी

दिवाळी आली की प्रत्येक घरात आनंदाची लगबग सुरू होते. कुणाच्या घरात फराळाचा सुगंध दरवळतो, कुणाच्या अंगणात पणत्यांची आरास सजते, तर कुणाच्या चेहऱ्यावर नव्या कपड्यांचा आनंद खुलतो. मात्र याच समाजात अशीही अनेक घरे आहेत, जिथे आर्थिक परिस्थितीच्या अंधारामुळे सणाचा प्रकाशही काहीसा फिका पडतो. चुलीची चिंता, संसाराचा संघर्ष आणि उद्याच्या जगण्याची विवंचना यामध्ये अनेक गरीब कुटुंबांना सण साजरा करण्याचेही बळ राहत नाही. अशा कुटुंबांच्या आयुष्यात आनंदाचा छोटासा किरण निर्माण करण्याचे काम लोकप्रिय समाजसेवक जावेद भैय्या कुरेशी यांनी यंदाच्या दिवाळीत केले आहे.

गरजू, निराधार आणि कष्टकरी महिलांची दिवाळी गोड व्हावी, त्यांच्या संसाराला थोडासा आधार मिळावा आणि त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य फुलावे, या संवेदनशील भावनेतून त्यांनी आपल्या लाडक्या भगिनींसाठी मोठ्या प्रमाणावर जीवनावश्यक वस्तूंच्या किटचे वाटप सुरू केले आहे. विशेष म्हणजे दररोज शेकडो महिलांना या किटचे वितरण केले जात आहे. हा केवळ वस्तू वाटपाचा कार्यक्रम नाही, तर समाजातील वंचित घटकांच्या दुःखात सहभागी होण्याची आणि त्यांना आपलेपणाची जाणीव करून देण्याची माणुसकीची कृती आहे.

आमदार-खासदारांच्या बंगल्यांपेक्षा समाज-सेवकाच्या दारात गरजवंतांचा विश्वास.!

लोकशाहीत आमदार, खासदार आणि राजकीय पदाधिकाऱ्यांच्या बंगल्यांना मोठे महत्त्व असते. जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी लोकप्रतिनिधींकडून अपेक्षा असणे स्वाभाविक आहे. मात्र निवडणुकीच्या काळात जनतेच्या दारात जाणारे अनेक जण निवडणुकीनंतर सामान्य माणसासाठी किती उपलब्ध राहतात, हा प्रश्न आजही अनुत्तरित आहे.

अशा परिस्थितीत जावेद भैय्या कुरेशी यांच्या दारात दररोज मदतीच्या अपेक्षेने येणाऱ्या गरजूंची गर्दी अनेकांना विचार करायला लावणारी आहे. ही गर्दी कोणत्याही राजकीय शक्तिप्रदर्शनासाठी नाही, कोणत्याही पदाच्या मोहासाठी नाही आणि प्रसिद्धीच्या हव्यासापोटीही नाही. ही गर्दी आहे ती आपल्या अडचणी सांगण्यासाठी, संकटाच्या काळात आधार मिळवण्यासाठी आणि आपले म्हणणे ऐकून घेणारा माणूस शोधण्यासाठी.!

कारण माणसाला नेहमी मोठ्या पदाची गरज नसते त्याला गरज असते ती त्याच्या दुःखाची जाणीव असणाऱ्या माणसाची. खुर्चीवर बसून मदत करण्यापेक्षा जमिनीवर बसून माणुसकी जपण्याचा मोठेपणा.! या उपक्रमातील सर्वाधिक भावस्पर्शी बाब म्हणजे जावेद भैय्या कुरेशी स्वतः जमिनीवर बसून महिलांना आपल्या हाताने जीवनावश्यक वस्तूंचे किट देतात. मदत घेण्यासाठी आलेल्या महिलांशी आपुलकीने संवाद साधतात. त्यांच्या अडचणी समजून घेतात. मदत करताना कोणताही मोठेपणा दाखवण्याऐवजी समोरच्या व्यक्तीचा सन्मान जपतात. समाजसेवा म्हणजे केवळ आर्थिक मदत करणे नव्हे, तर मदत स्वीकारणाऱ्या व्यक्तीचा स्वाभिमान दुखावला जाणार नाही, याची काळजी घेणेही होय.

गरजूंच्या डोळ्यांतील अश्रू पुसताना त्यांच्या मनातील वेदना समजून घेणे, हाच खऱ्या समाजसेवेचा आत्मा आहे. मदतीचा हात मोठा असण्यापेक्षा तो देताना मन मोठे असणे महत्त्वाचे असते, याचे दर्शन या उपक्रमातून घडत आहे. दिवाळीपुरती समाजसेवा नाही, तर वर्षभर सुरू असलेली माणुसकीची चळवळ.! जावेद भैय्या कुरेशी यांचे सामाजिक कार्य केवळ सण-उत्सवांपुरते मर्यादित नसून विविध गरजांच्या वेळी मदतीचा हात पुढे करण्याचा त्यांचा प्रयत्न असल्याचे दिसून येते. त्यांच्या सामाजिक उपक्रमांची व्याप्ती विविध स्तरांवर जाणवते. महिला सक्षमीकरण: गरजू महिलांना शिलाई मशीन देऊन स्वावलंबी होण्याची संधी उपलब्ध करून देणे.

अन्नसुरक्षेचा आधार: आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना किराणा व जीवनावश्यक वस्तूंच्या किटचे वाटप. आरोग्यसेवा: आजारी रुग्णांची विचारपूस करून उपचारांसाठी आर्थिक मदत. शिक्षणाला हातभार: गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आर्थिक सहकार्य. वृद्धांना आधार: निराधार वृद्ध आणि कष्टकरी महिलांच्या अडचणींमध्ये मदतीसाठी पुढाकार. सामाजिक बांधिलकी: संकटात सापडलेल्या सर्वसामान्य नागरिकांना शक्य ती मदत. या विविध माध्यमांतून हजारो गरजूंपर्यंत मदतीचा हात पोहोचविण्याचा त्यांचा प्रयत्न समाजात चर्चेचा विषय ठरत आहे.

राजकारणात पदे मिळतात, पण समाजाच्या मनात स्थान निर्माण करावे लागते.!

आजच्या काळात समाजसेवेच्या नावाखाली प्रसिद्धी मिळविण्याचे अनेक मार्ग उपलब्ध आहेत. मोठमोठे कार्यक्रम, बॅनर, जाहिराती आणि छायाचित्रांच्या माध्यमातून समाजकार्याचा गाजावाजा केला जातो. मात्र एखाद्या गरजूच्या अडचणीच्या वेळी त्याच्या पाठीशी उभे राहणे, त्याच्या संसाराला आधार देणे आणि त्याच्या चेहऱ्यावर समाधान निर्माण करणे, ही खरी सामाजिक बांधिलकी आहे.

राजकीय पदे ही काळानुसार बदलतात. सत्ता येते आणि जाते. खुर्च्या बदलतात, राजकीय समीकरणे बदलतात; मात्र संकटाच्या वेळी मदतीला धावून आलेल्या माणसाची आठवण समाजाच्या मनात कायम राहते. लोकांचा विश्वास हा कोणत्याही पदापेक्षा मोठा असतो आणि तो केवळ कृतीतूनच मिळवता येतो.

जावेद भैय्या कुरेशी यांच्या सामाजिक उपक्रमाकडे याच दृष्टिकोनातून पाहण्याची गरज आहे. कारण समाजाला केवळ आश्वासने देणारे चेहरे नको आहेत, तर प्रत्यक्ष कृतीतून माणुसकी जपणारे हात हवे आहेत.

पणत्यांचा प्रकाश क्षणिक, माणुसकीचा प्रकाश मात्र कायमचा.!

दिवाळीत हजारो दिवे लावून घर उजळवता येते.परंतु एखाद्या गरजू कुटुंबाच्या आयुष्यात आनंद निर्माण करणे, एखाद्या निराधार महिलेच्या चेहऱ्यावर हसू फुलवणे आणि एखाद्या गरीब विद्यार्थ्याच्या शिक्षणाला हातभार लावणे, यापेक्षा मोठा प्रकाश कोणता असू शकतो..?

आज जावेद भैय्या कुरेशी यांच्या उपक्रमातून हाच सामाजिक संदेश समोर येत आहे. समाजात श्रीमंती केवळ पैशाने मोजली जात नाही, तर ती दुसऱ्याच्या वेदना समजून घेण्याच्या संवेद-नशीलतेतूनही मोजली जाते.

शेवटी एकच सांगावेसे वाटते...

आमदार-खासदारांच्या बंगल्यांना मोठेपणा त्यांच्या पदामुळे मिळतो. मात्र समाजसेवकाच्या दाराला मोठेपणा तिथे येणाऱ्या गरजवंतांच्या विश्वासामुळे मिळतो. राजकीय बंगल्यांवर किती गर्दी होते, यापेक्षा एखाद्या माणसाच्या दारात किती दुःखी चेहरे आशेने येतात आणि किती चेहरे समाधानाने परततात, हेच त्याच्या कार्याचे खरे मोजमाप असते.

यंदाच्या दिवाळीत जावेद भैय्या कुरेशी यांनी जीवनावश्यक वस्तूंच्या किटच्या माध्यमातून केवळ गरजू महिलांना मदत केली नाही, तर समाजासमोर माणुसकीचा एक सुंदर आदर्शही ठेवला आहे.

कारण दिवाळी फक्त स्वतःचे घर उजळवण्याचा सण नाही तर दुसऱ्याच्या आयुष्यातील अंधार दूर करण्याची संधी आहे. आणि दुसऱ्याच्या घरात आनंदाचा दिवा पेटवणारा माणूसच खऱ्या अर्थाने समाजाच्या मनात कायमचा उजळत राहतो.!

विद्यार्थ्यांनी परिश्रमातून प्रगती साधावी - डॉ. धोंडीराम वाडकर



मुखेड (प्रतिनिधी)

विठू माऊली बहुउद्देशीय प्रतिष्ठान खैरकावाडी ता.मुखेडच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार शनिवारी करण्यात आला. विद्यार्थ्यांनी परिश्रमातून प्रगती साधावी. परिश्रम केल्याशिवाय आपण उच्चपदावर पोहोचू शकत नाही. असे प्रतिपादन सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. धोंडीराम वाडकर यांनी केले. गोकुळवाडी येथे :मालती' कथा संग्रहाचे मातेच्या हस्ते व 'विवेक मंत्र' ग्रंथाचे पत्नीचे हस्ते प्रकाशन करण्यात आले. राष्ट्रसंत वै. धर्मभूषण व वटेमोड महाराज यांच्या दशकपूर्ती स्मृती सोहळ्या निमित्त कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

माजी नगराध्यक्ष श्री बाबुराव देबडवार यांना राष्ट्रसंत वटेमोड महाराज जीवन गौरव, प्रबोधन रत्न डॉ.रामकृष्ण बदने यांना तसेच मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष, श्री यशवंत बोडके यांना आचार्य बाळशास्त्री जांभेकर दर्पण पुरस्कार, जयश्रीताई पाळेकर यांना आदर्श शिक्षिका, श्री माधव वटपलवाड यांना आदर्श शिक्षक सौ.मनीषा कोंडेवाड यांना गंगाई तर श्री सुग्रीव शिंदे यांना कृषी रत्न पुरस्कार तर श्री ज्ञानेश्वर शिरबरतळ यांना गुणवंत कर्मचारी पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आले. यावेळी लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सौ.कल्याणी बरसमवाड यांनी आभार मानले.

बालाजी अर्बन क्रेडिट सोसायटीच्या भव्य शुभारंभाची जय्यत तयारी! मान्यवरांच्या उपस्थितीत शुभारंभ सोहळा

वडवणी प्रतिनिधी :-

वडवणी शहरातील बालाजी अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेडच्या भव्य शुभारंभ सोहळ्याची जय्यत तयारी सुरू असून, आज दि. १० नोव्हेंबर २०२६ मंगळवार रोजी स्थळ वसंतराव नाईक चौक वडवणी येथे सकाळी ११ वाजता हा सोहळा उत्साहात संपन्न होणार आहे.

या शुभारंभ सोहळ्यास श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथील श्री ह.भ.प. शांतिब्रह्म लवळनाथ बाबा यांचे आशीर्वाद लाभणार आहेत. तसेच श्री राजा हरिश्चंद्र संस्थान पिंपरी येथील श्री ह.भ.प. भगवान महाराज राजपूत यांच्या शुभहस्ते हा सोहळा संपन्न होणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहकार निरीक्षक श्री. दीपक पळळ साहेब राहणार असून, प्रमुख पाहुणे म्हणून श्री सिद्धिविनायक अर्बन, पिंपळनेरचे अध्यक्ष श्री. गणेश सावंत साहेब उपस्थित राहणार आहेत.



संस्थेचे अध्यक्ष श्री. विनायक विश्वनाथ मुळे, उपाध्यक्ष श्री. अंबादास त्रिंबक जाधव, संचालक मंडळातील सर्व सदस्य तसेच कर्मचारी वृंद यांच्या पुढाकारातून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सहकार क्षेत्राच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक सुविधा व सहकार्य उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने बालाजी अर्बन क्रेडिट सोसायटीची वाटचाल सुरू होत आहे. संस्थेच्या या नव्या उपक्रमामुळे वडवणी शहरासह परिसरातील नागरिकांना सहकार क्षेत्रातील आर्थिक व्यवहारांसाठी एक नवा पर्याय उपलब्ध होणार आहे.

या भव्य शुभारंभ सोहळ्यास वडवणी शहर व परिसरातील नागरिक, व्यापारी, हितचिंतक आणि सर्व बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन बालाजी अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या वतीने करण्यात आले आहे.

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, श्री. विजयकुमार बी.साळुंके यांचे न्यायालयात किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १७९८/२०२६

लक्ष्मीबाई व इतर वि. निरंक

(मार्फत ॲड. टेकाडे वाय.एस)

ज्याअर्थी मयत नामे **शंकर किसन वाघमारे**, हे / हया दिनांक २९/०३/२०२५ रोजी **अंधापुरी, ता. जि.बीड** येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. **१ लक्ष्मीबाई शंकर वाघमारे, रा.अंधापुरी, ता. जि.बीड ह.मु.झरेकर पार्क जवळ, दिघी कँप पुणे, अर्जदार क्र. २. दिनेश शंकर वाघमारे, रा.सदर, ३. सुनिल शंकर वाघमारे, रा.सदर, ४. अनिल शंकर वाघमारे, रा.सदर, ५.राधा चंदू गालफाडे, रा. विठ्ठल नगर, लांडेवाडी, भोसरी पुणे.**

यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे क्लम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून **तीस दिवसाचे आत** त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०२/११/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :- १८/१२/२०२६

स्वाक्षरीत /-
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय, क. स्तर,बीड

शिक्का

स्वाक्षरीत/-
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर,बीड

मा.श्री.एस.एस.बडगुजर न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .४७४/२०२६

सचिन वि. मुख्याधिकारी, ता.केज, जि.बीड

ज्याअर्थी अर्जदार नामे **सचिन दशरथ बल्लाळ, रा.चंदवाडी, फुरसंगी पुणे, जि.पुणे** यांनी येथे गैरअर्जदार वि **मुख्याधिकारी, ता. केज, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांचा मुलगा नामे आयुष सचिन बल्लाळ यांच्या दि.०६/०८/२०१० रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०५/११/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :– १६/१२/२०२६

स्वाक्षरीत/–
कनिष्ठ लिपीक
शिक्का
आदेशावरुन
सहा. अधिक्षक
न्यायदंडाधिकारी न्यायालय,
क.स्तर केज

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा
गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, श्री. रविंद्र अ. मिसाळ यांचे न्यायालयात यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १००२/२०२६
शांताबाई व इतर वि. निरंक
(मार्फत ॲड. आर.एम.खरात, गेवराई)

ज्याअर्थी मयत नामे **शाहु पि.रुंजाजी निकाळजे**, हे / हया दिनांक **१४/०१/२०२५** रोजी **मौजे धोंडराई, ता. गेवराई जि. बीड** येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. **१. शांताबाई भ्र. मधुकर हराळे, वय ६५ वर्षे, धंदा–शेती, रा.झोपडपट्टी धोंडराई, ता. गेवराई जि. बीड.**

यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे क्लम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून **तीस दिवसाचे आत** त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०६/११/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :– २१/१२/२०२६

स्वाक्षरीत /–
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, गेवराई
शिक्का
स्वाक्षरीत/–
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा
गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, श्री. एच.एम.मोमीन यांचे न्यायालयात यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ९९३/२०२६
मुक्ताबाई व इतर वि. निरंक
(मार्फत ॲड. व्ही.आर. वराट, गेवराई)

ज्याअर्थी मयत नामे **त्रिंबक पि.मारुती सिरसट**, हे / हया दिनांक **२७/०९/२०२६** रोजी **मौजे कुंभारवाडी, ता. गेवराई जि. बीड** येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. **१. मुक्ताबाई भ्र. त्रिंबक सिरसट, वय ८० वर्षे, धंदा–घरकाम, रा.कुंभारवाडी, ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क्र. २. वैजनाथ पि. त्रिंबक सिरसट, वय ५४ वर्षे, धंदा – शेती, रा. कुंभारवाडी, ता.गेवराई, जि.बीड, ३. लंकाबाई भ्र. रामा समगे, वय ५० वर्षे, धंदा – शेती, रा. जोडवाडी, ता.गेवराई, जि.बीड,**

यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे क्लम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून **तीस दिवसाचे आत** त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०५/११/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :– १४/१२/२०२६

स्वाक्षरीत /–
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, गेवराई
शिक्का
स्वाक्षरीत/–
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, श्री. एच.एम.मोमीन यांचे न्यायालयात किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १०२३/२०२६
शांताबाई व इतर वि. निरंक
(मार्फत ॲड. एच.एस.पाटील, गेवराई)

ज्याअर्थी मयत नामे **पांडुरंग संतु पोकळे**, हे / हया दिनांक ०२/१२/२०२५ रोजी **मौजे उमापुर, ता.गेवराई, जि.बीड** येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. **१ शांताबाई भ्र. पांडुरंग पोकळे, वय ८१ वर्षे, धंदा–शेती व घरकाम, रा.उमापुर, ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. २. भगवान पि.पांडुरंग पोकळे, वय ६१ वर्षे, धंदा शेती, रा.उमापुर, ता. गेवराई जि.बीड. ३. कांताबाई भ्र.श्रीधर पादर, वय ४७ वर्षे, धंदा घरकाम, रा.लाडजळगांव, ता.शेवगांव, जि.अ.नगर. ४. नंदाबाई भ्र.बबन पोकळे, वय ५९ वर्षे, धंदा शेती, रा.उमापुर, ता.गेवराई, जि.बीड. ५.लक्ष्मण पि. बबन पोकळे, वय ३१ वर्षे, धंदा शेती, रा.उमापुर, ता. गेवराई, जि.बीड.**

यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे क्लम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून **तीस दिवसाचे आत** त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०५/११/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :– २१/१२/२०२६

स्वाक्षरीत /–
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, गेवराई
शिक्का
स्वाक्षरीत/–
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई

श्रीमती.एम.एस.कुलकर्णी न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, केज यांचे न्यायालयात
किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .४७३/२०२६
सचिन वि. न.प. केज, ता.केज, जि.बीड

ज्याअर्थी अर्जदार नामे **सचिन दशरथ बल्लाळ, रा.चंदवाडी, फुरसंगी पुणे, जि.पुणे** यांनी येथे गैरअर्जदार वि **मुख्याधिकारी, न.प.ता. केज, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांचा मुलगा नामे शिवतेज सचिन बल्लाळ यांच्या दि.३०/०८/२०११ रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०५/११/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :– १६/१२/२०२६

स्वाक्षरीत/–
कनिष्ठ लिपीक
शिक्का
आदेशावरुन
सहा. अधिक्षक
न्यायदंडाधिकारी न्यायालय,
क.स्तर केज

मा.श्री.एच.एम.मोमीन न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.२ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .११३६/२०२६
रखमाजी हंडाळा वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत ॲड आर.एम.खरात)

ज्याअर्थी अर्जदार नामे **रखमाजी पि. आन्ना हंडाळा, रा.धोंडराई, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, धोंडराई, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांचे वडील नामे आन्ना पि.जानु हंडाळा यांच्या दि.१२/०५/१९९० रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०६/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :– २३/१२/२०२६

स्वाक्षरीत/–
कनिष्ठ लिपीक
शिक्का
आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा
गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, २ रे सह दिवाणी न्यायालय गेवराई यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ६१७/२०२६
सोजरबाई व इतर वि. निरंक
(मार्फत ॲड. एम.वाय.इनामदार, गेवराई)

ज्याअर्थी मयत नामे **गोपीनाथ पि. बालुजी धस**, हे / हया दिनांक २८/०४/२०२६ रोजी **मौजे तळनेवाडी, ता. गेवराई जि. बीड** येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. **१ सोजरबाई भ्र. गोपीनाथ धस, वय ७३ वर्षे, धंदा–घरकाम, रा.तळनेवाडी, ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क्र. २ धुराजी पि. गोपीनाथ धस, वय ४२ वर्षे, धंदा – व्यवसाय, रा. तळनेवाडी, ता.गेवराई, जि.बीड, ३. शरद पि. गोपीनाथ धस, वय ३८ वर्षे, धंदा – शेती, रा. तळनेवाडी, ता.गेवराई, जि.बीड, ४.मंगल भ्र. प्रल्हाद भिल्लारे, वय ४४ वर्षे, धंदा शेती व घरकाम, रा. टेंबी आंतरवाली, ता.घनसांगवी, जि.जालना.**

यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे क्लम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून **तीस दिवसाचे आत** त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक / /२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :– २३/११/२०२६

स्वाक्षरीत /–
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, गेवराई
शिक्का
स्वाक्षरीत/–
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, श्री. रविंद्र अ. मिसाळ यांचे न्यायालयात किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ९७६/२०२६
मनिषा भ्र. प्रभाकर लाखे व इतर वि. निरंक
(मार्फत ॲड. आर.एल.गवारे, गेवराई)

ज्याअर्थी मयत नामे **प्रभाकर पि.रेनाभाऊ लाखे**, हे / हया दिनांक २४/०१/२०२५ रोजी **एरंडगाव, ता.गेवराई, जि.बीड** येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. **१ मनिषा भ्र. प्रभाकर लाखे, वय ५० वर्षे, धंदा–घरकाम, रा.एरंडगाव, ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. २ विजय पि. प्रभाकर लाखे, वय २९ वर्षे, धंदा शेती, रा. सदर, ३. आकाश पि. प्रभाकर लाखे, वय २७ वर्षे, धंदा नोकरी, रा.सदर, ४ राजश्री भ्र. प्रदिप देवकर, वय २५ वर्षे, धंदा घरकाम, रा. निमगाव, ता. शिरुर कासार, जि.बीड.**

यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे क्लम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून **तीस दिवसाचे आत** त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०२/११/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :– १८/१२/२०२६

स्वाक्षरीत /–
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, गेवराई
शिक्का
स्वाक्षरीत/–
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई

मा.श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .१००३/२०२६
भास्कर वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत ॲड.आर.डी.भांबरे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **भास्कर एकनाथ खरात, रा.आमला, ता.गे–वराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, आमला(वाहेगाव), ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांचा मुलगा नामे सुहास भास्कर खरात यांच्या दि.२७/११/२००८ रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०३/११/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :– १९/१२/२०२६

स्वाक्षरीत/–
कनिष्ठ लिपीक
शिक्का
आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.आर.ए.मिसाळ न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.१ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .७८३/२०२६
मनिषा वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय

ज्याअर्थी अर्जदार नामे **मनिषा लक्ष्मीकांत चव्हाण, रा.आडपिंपरी, ता.गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, धुमेगांव/आडपिंपरी, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांचा मुलगा नामे हार्दिक लक्ष्मीकांत चव्हाण यांच्या दि.२५/०१/२०२४ रोजीची** जन्म नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक १९/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :– १८/१२/२०२६

स्वाक्षरीत/–
कनिष्ठ लिपीक
शिक्का
आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा
गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, श्री. रविंद्र अ. मिसाळ यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ९६४/२०२६
अर्जुन पि.महादेव होडशीळ व इतर वि. निरंक
(मार्फत ॲड. जी.पी.गवारे, गेवराई)

ज्याअर्थी मयत नामे **महादेव गणपत होडशीळ**, हे / हया दिनांक **१८/०४/२०२१** रोजी **गुळज, ता. गेवराई जि. बीड** येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. **१ अर्जुन पि.महादेव होडशीळ, वय ३८वर्षे, धंदा–शेती, रा. गुळज, ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क्र. २ कुसुम भ्र. महादेव होडशीळ, वय ७० वर्षे, धंदा – शेती, रा. गुळज, ता.गेवराई, जि.बीड.**

यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे क्लम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून **तीस दिवसाचे आत** त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०२/११/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :– १७/१२/२०२६

स्वाक्षरीत /–
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, गेवराई
शिक्का
स्वाक्षरीत/–
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, श्री. एच.एम.मोमीन यांचे न्यायालयात किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ९८५/२०२६
छबुबाई व इतर वि. निरंक
(मार्फत ॲड. एस.एस. पाटील, गेवराई)

ज्याअर्थी मयत नामे **अशोक बापुराव आगरकर**, हे / हया दिनांक २९/०८/२०२२ रोजी **मौजे गायकवाड जळगांव, ता.गेवराई, जि.बीड** येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. **१ छबुबाई भ्र. अशोक आगरकर, वय ७० वर्षे, धंदा–शेती व घरकाम, रा.गायकवाड जळगांव, ता. गेवराई जि.बीड, अर्जदार क्र. २ दादासाहेब पि. अशोक आगरकर, वय ३५ वर्षे, धंदा शेती, रा. गायकवाड जळगांव, ता. गे–वराई, जि.बीड, ३. मंगल भ्र.बबन पाटील, वय ४२ वर्षे, धंदा घरकाम, रा. कल्याण, ता. कल्याण, जि. ठाणे, ४ सखुबाई भ्र. भाऊसाहेब राऊत, वय ४४ वर्षे, धंदा शेती व घरकाम, रा. उमापुर. ता. गेवराई जि.बीड, ५. अयोध्या भ्र. भिश्माचार्या अंतरकर, वय ४६ वर्षे, धंदा शेती व घरकाम, रा.गायकवाड जळगांव, ता. गेवराई जि.बीड.**

यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे क्लम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून **तीस दिवसाचे आत** त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदाराच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ३१/१०/२०२६ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख :– १४/१२/२०२६

स्वाक्षरीत /–
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायालय, क. स्तर, गेवराई
शिक्का
स्वाक्षरीत/–
सहायक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, गेवराई

मा.श्री.एच.एम.मोमीन न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.२ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .१०१२/२०२६
मनिषा वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय

ज्याअर्थी अर्जदार नामे **मनिषा विजयराव सरडे, रा.राक्षसभुवन, ता. गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, राक्षसभुवन, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांची स्वतः नामे मनिषा विजयराव सरडे, यांच्या दि. १९/१०/१९८८ रोजीची** मृत्यु नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ३१/१०/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :– २४/१२/२०२६

स्वाक्षरीत/–
कनिष्ठ लिपीक
शिक्का
आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

मा.श्री.एच.एम.मोमीन न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, न्यायालय क्र.२ गेवराई, जि.बीड यांच्या न्यायालयात किरकोळ फौ. अर्ज क्रमांक .१०२४/२०२६
जयदीप वि. ग्रामसेवक ग्रा.कार्यालय
(मार्फत ॲड एस.एस.काळे)

ज्याअर्थी अर्जदार नामे **जयदीप पि.सखाराम ढगे, रा.टाकळगव्हाण, ता. गेवराई, जि. बीड** यांनी येथे गैरअर्जदार वि **ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय, टाकळगव्हाण, ता. गेवराई, जि. बीड** यांचे विरुध्द जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अर्जदार **यांचा मुलगा नामे साईराज जयदीप ढगे, यांच्या दि. १३/१२/२००९ रोजीची** मृत्यु नोंद घेणेबाबत असा अर्ज या न्यायालयात सादर केला आहे व त्याबाबत गैरअर्जदारास नोटीस जाहिर प्रगटनाद्वारे बजावणी व्हावी असा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जावर गैरर्जदारास किंवा इतर कोणास काही म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत गैरर्जदाराने योग्य हरकती न दाखविल्यास तर सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचा अर्ज मंजुर करण्यात येईल.

आज दिनांक ०७/११/२०२६ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.
पुढील तारीख :– २३/१२/२०२६

स्वाक्षरीत/–
कनिष्ठ लिपीक
शिक्का
आदेशावरुन
सहा. अधिक्षक
फौजदारी न्यायालय, गेवराई

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा
गेवराई, जि.बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, श्री. एच. एम.मोमीन यांचे न्यायालयात
किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ९६७/२०२६
हेमाबाई व इतर वि. निरंक
(मार्फत ॲड. एच.एस.पाटील, गेवराई)

ज्याअर्थी मयत नामे **लालु रामु जाधव**, हे / हया दिनांक ०३/१२/२०२३ रोजी **मौजे उमापुर, ता. गेवराई जि. बीड** येथे मयत झाले / झाल्या आहेत, अर्जदार क्र. **१ हेमाबाई भ्र. लालु जाधव, वय ८० वर्षे, धंदा–शेती, रा. गणेश नगर उमापुर, ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क्र. २ विष्णु पि. लालु जाधव, वय ६१ वर्षे, धंदा – शेती, रा. उमापुर, ता.गेवराई, जि.बीड अर्जदार क्र. ३ हौसाबाई भ्र. नामदेव जाधव, वय ५२ वर्षे, धंदा शेती, रा. गणेश नगर उमापुर, ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क्र. ४ नितीन पि. नामदेव जाधव, वय ३५ वर्षे, धंदा–शेती, रा. उमापुर, ता. गेवराई, जि. बीड.**

यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे क्लम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हते असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून **तीस दिवसाचे आत** त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदत

दैनिक समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA)
विविध वृत्त
मंगळवार दि. १० नोव्हेंबर २०२६
Tuesday, Dt. 10 November 2026
पान -४
PAGE - 4

विद्युत तारेच्या घर्षणामुळे भडका! सर्व्हे नं. २२५ मधील २ एकर, दीड वर्षाचा ऊस आगीत भस्मसात

२७-२८ कांड्याचा तोडणीला आलेला ऊस क्षणात खाक । नगरपंचायत प्रशासन व विद्युत महामंडळाच्या सतर्कतेमुळे पशुधन व जीवितहानी टळली

मानूर प्रतिनिधी , दि. ८/११/२०२६ रोजी : विद्युत तारेच्या घर्षणामुळे शिरूर कासार येथील सर्व्हे नंबर २२५ मधील देसरडा फार्म हाऊस येथील दोन एकर ऊस जळाला. रात्रीच्या अंधारात आगीने रौद्र रूप धारण केल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. मात्र नगरपंचायत प्रशासन व विद्युत महामंडळ यांच्या सतर्कतेमुळे पशुधन व जीवितहानी टळली.

शिरूर कासार येथील सर्व्हे नंबर २२५ मधील शेतातून गेलेल्या विद्युत तारा वाऱ्यामुळे एकमेकांवर घासल्या गेल्या. त्यातून निघालेली ठिणगी थेट वाळलेल्या उसाच्या पाचटावर पडली आणि पाहता पाहता आगीने भडका घेतला. आगीचे उंचच उंच लोळ आणि धुराचे लोट लांबूनच दिसत होते. वाऱ्यामुळे आग झपाट्याने दोन एकर क्षेत्रात पसरली.

जळालेला ऊस हा साधा नव्हता. हा *दीड वर्षाचा, २७-२८ कांड्याचा* ऊस होता. म्हणजे हा ऊस एकदम जोमात आलेला, तोडणीला आलेला ऊस होता.



शेतकऱ्याने दीड वर्ष जीवाचे रान करून, पाण्याची काटकसर करून या उसाला लहानाचे मोठे केले होते. शिरूर तालुक्यातील भयानक दुष्काळी परिस्थितीतही या उसाची निगा राखली होती. हातातोंडाशी आलेला घास आगीने हिरावून घेतल्याने शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. घटनेची माहिती मिळताच नगरपंचायत प्रशासन, व विद्युत महामंडळाचे कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी सर्वप्रथम विद्युत पुरवठा खंडित करून पुढील धोका टाळला. त्यानंतर ग्रामस्थांनी पाण्याच्या साहाय्याने आग विझविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. त्यांच्या सतर्कतेमुळेच आग शेजारील शेतात व फार्म हाऊसवर पसरली नाही व पशुधन व जीवितहानी टळली.

ऊस जळाल्याने जनावरांसाठी चाऱ्याची मोठी टंचाई निर्माण होणार आहे. प्रशासनाने तातडीने सर्व्हे नंबर २२५ चा पंचनामा करून नुकसानग्रस्त शेतकऱ्याला योग्य ती आर्थिक मदत द्यावी, तसेच महामंडळाने झिजलेल्या व लोंबकळणाऱ्या तारा तातडीने बदलून अशा घटना टाळाव्यात, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांतून होत आहे.

तुटपुंज्या मदतीविरोधात परळीत महाविकास आघाडीचे 'भीक मागो आंदोलन'

परळी / प्रतिनिधी

राज्यात भीषण दुष्काळी परिस्थिती असताना राज्य सरकारने शेतकऱ्यांना दिलेल्या ५ हजार रुपयांच्या तुटपुंज्या मदतीचा आणि सत्ताधारी नेत्यांच्या बेताल वक्तव्यांचा निषेध करण्यासाठी परळी वैजनाथ येथे महाविकास आघाडीच्या वतीने तीव्र 'भीक मागो आंदोलन' करण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी शहरातील बाजारपेठेत फिरून भीक मागितली व जमा झालेली ५ हजार रुपयांची रक्कम तहसीलदारांकडे सुपूर्द करून शासनाचा अनोख्या पद्धतीने निषेध नोंदवला.

संपूर्ण महाराष्ट्रात दुष्काळाची तीव्र झळ बसत असताना शासनाने जाहीर केलेली ५ हजार रुपयांची मदत ही शेतकऱ्यांची निव्वळ थट्टा आहे, अशी संतप्त भावना आंदोलकांनी व्यक्त केली. या आंदोलनात शिवसेना (उबाठा) नेत्या सुषमा अंधारे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र



पवार पक्षाचे नेते राजाभाऊ फड यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. नेत्यांनी स्वतः हातात कटोरा घेऊन परळी शहरातील संपूर्ण व्यापारपेठेत दुकानांदुकानांत फिरून निधी गोळा केला.

सत्ताधाऱ्यांच्या वाचाळपणावर सुषमा यांनी भाजप नेत्यांवर आणि मंत्री गिरीश महाजन यांच्यावर जोरदार निशाणा साधला. ''राज्यात महाबळेश्वर सारखा तालुकाही दुष्काळाच्या चपेट्यात आला आहे. अशा संकटाच्या काळात सरकार ५ हजार रुपयांची तुटपुंजी मदत देऊन जनतेची थट्टा करत आहे. त्यातच गिरीश महाजन आणि सत्ताधाऱ्यांचे प्रवक्ते शेतकऱ्यांचा अपमान करणारी वक्तव्ये करत आहेत. सरकारला आपले ५ हजार रुपये परत हवे असतील, तर आम्ही पोटाला चिमटा घेऊन आणि भीक मागून ते पैसे परत करू, पण जनतेचा अपमान सहन करणार नाही,'' असे सांगत त्यांनी जमा केलेली ५ हजार रुपयांची रक्कम तहसीलदारांकडे सुपूर्द केली.

'राजा उदार झाला आणि हाती भोपळा दिला'

राजाभाऊ फड यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते राजाभाऊ फड यांनी महागाई आणि शेतकऱ्यांच्या दुरवस्थेवरून सरकारला धारेवर धरले. ''डाळ, तांदूळ, गहू, तेल, साखर या सर्वच जीवनावश्यक वस्तूंचे भाव दुप्पट-तिप्पट वाढले आहेत. अशा परिस्थितीत ५ हजार रुपयांत दिवाळी कशी साजरी करायची? शासनाची ही मदत म्हणजे 'राजा उदार झाला आणि हाती भोपळा दिला' असा प्रकार असून शेतकऱ्यांवर दिवाळीऐवजी शिमगा साजरा करण्याची वेळ आली आहे,'' अशी टीका फड यांनी केली. खा. शरद पवार यांनी मागणी केल्याप्रमाणे शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये आणि शेतमजुरांना ५ हजार रुपये मदत देण्यात यावी, अशी आग्रही मागणी यावेळी महाविकास आघाडीच्या वतीने करण्यात आली. शहरातील व्यापारी आणि शेतकऱ्यांकडून गोळा केलेली ५ हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम शासनाला परत देत, सरकारने स्वतः या ५ हजार रुपयांत दिवाळी साजरी करून दाखवावी, असे आव्हानही आंदोलकांनी यावेळी दिले.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई शाखा केजच्या नवनिर्वाचित कार्यकारिणीची घोषणा



केज/प्रतिनिधीः महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई शाखा केज तालुका कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली आहे. या नवनिर्वाचित कार्यकारिणीचे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संपर्कप्रमुख तथा दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी आणि मराठवाडा विभागीय महिला अध्यक्ष आयेशा शेख यांनी शाल व पुष्पगुच्छ देऊन नवनिर्वाचित सर्व पदाधिकाऱ्यांचे स्वागत केले तसेच पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

या नवीन कार्यकारिणीमध्ये केज तालुकाध्यक्षपदी दैनिक समर्थ राजयोग चे तालुका प्रतिनिधी चंद्रकांत पाटील यांची पुन्हा एकदा निवड जाहीर करण्यात आली. तर दैनिक पार्श्वभूमीचे दीपक साखरे यांची सचिवपदी निवड करण्यात आली आहे.

केज तालुका नव निर्वाचित कार्यकारिणी पुढीलप्रमाणे आहेः अध्यक्ष-चंद्रकांत पाटील (दै.समर्थ राजयोग),सचिव- दिपक साखरे (दै. पार्श्वभूमी),उपाध्यक्ष- कृष्णा केदार (बीड डिजिटल न्यूज), उपाध्यक्ष-संदीप घुगे (सारथी महाराष्ट्राचा) कोषाध्यक्ष- हिराचंद काळे (दै.सांज सुयोग) सदस्य, कमलाकर सोनवणे (मराठवाडा पत्र), बाबासाहेब सिरसाट (महा.पोलीस रॅपिड),अमोल शेटे (दै. मराठवाडा साथी -ग्रामीण), सार्थक पाटील (स्वाभिमानी न्यूज), वैजनाथ काळे (तहेलका न्यूज), अविनाश साबळे (मराठवाडा दर्शन), गोरक्षनाथ राहणे (मराठवाडा साथी), कायदेशीर सल्लागार- ॲड.एस.बी.मस्के यांची निवड करण्यात आली आहे.पत्रकारांचे हक्क,संरक्षण आणि सामाजिक प्रश्नांना न्याय मिळवून देण्या साठी ही नवनिर्वाचित कार्यकारिणी कटिबद्ध राहील, असा विश्वास यावेळी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.या निवडीबद्दल तालुक्यातील सामाजिक, राजकीय व पत्रकारिता क्षेत्रातून कार्यकारिणीचे अभिनंदन होत आहे.

केजच्या बीड रोडवर नगरपंचायतीच्या गाळ्याला आग; अग्निशमन दलाच्या तत्परतेने मोठा अनर्थ टळला!

केज/प्रतिनिधी

केज शहरातील बीड रोड परिसरात रविवार, दि.८ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ठीक ८ वाजण्याच्या सुमारास नगर पंचायतीच्या गाळ्याला अचानक आग लागल्याची घटना घडली. फटाक्यांच्या ठिणग्यांमुळे ही आग लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाची गाडी तात्काळ घटनास्थळी दाखल झाली. अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी प्रसंगावधान राखत



तातडीने आग विझवली. त्यामुळे आग अधिक पसरून मोठे नुकसान होण्याचा धोका टळला. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. अग्निशमन दलाच्या तत्परतेमुळे संभाव्य अनर्थ टळल्याने नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला. सणासुदीच्या काळात नागरिकांनी फटाके फोडताना विशेष खबरदारी घ्यावी. दुकानां च्या परिसरात व सार्वजनिक ठिकाणी फटाके फोडणे टाळावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

उभारणार; ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांची केजमध्ये ग्वाही

केज/प्रतिनिधी : केज शहरातील शिक्षक कॉलनी भागातील राष्ट्रसंत भगवान बाबा मंदिराच्या समोर भव्य- दिव्य असा तब्बल २० लाख रुपयांचा सभा मंडप लवकरच साकारला जाईल, असा शब्द भाजपचे ज्येष्ठ नेते आंबेजोगाई चे नगराध्यक्ष नंदकिशोर (काकाजी) मुंदडा यांनी सर्व भगवान बाबा भक्त, महिला मंडळ आणि स्थानिक रहिवाशांना दिला.दिनांक ७ नोव्हेंबर रोजी ज्येष्ठ पत्रकार प्रकाश मुंडे यांच्या निवासस्थानी शिक्षक कॉलनीतील नागरिकांची एक महत्त्व-पूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत उपस्थितांशी संवाद साधताना काकाजी मुंदडा यांनी ही महत्त्वाची घोषणा केली.शिक्षक कॉलनी तील राष्ट्रसंत भगवान बाबा मंदिरासमोर कार्यक्रमांसाठी व भक्तांच्या



सोयीसाठी भव्य सभामंडप उभारण्यात यावा, अशी आग्रही मागणी पत्रकार प्रकाश मुंडे, भाजप तालुकाध्यक्ष भगवानराव केदार आणि परिसरातील नागरिकांनी आमदार नमिताताई मुंदडा व आदरणीय नंदकिशोर काकाजी मुंदडा यांच्या कडे लावून धरली होती.नागरिकांची गरज आणि भक्तांची श्रद्धा लक्षात घेऊन नंदकिशोर काकाजी मुंदडा यांनी या मागणी ची तात्काळ दखल घेतली.हा सभामंडप त्वरित मंजूर करून लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली जाईल,अशी ग्वाही त्यांनी या वेळी दिली. नंदकिशोर मुंदडा काकाजी यांच्या या घोषणेमुळे शिक्षक कॉलनी परिसर आणि भगवान बाबांच्या भक्तगणांमध्ये अत्यंत आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

बैठकीस मान्यवरांची प्रमुख उपस्थितीः या प्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उप सभापती डॉ.वासुदेव नेहरकर, भाजप तालुका ध्यक्ष भगवान केदार, प्रकाश मुंडे, बाबासाहेब केदार सर, मुकुंद घुले सर, महादेव केंद्रे सर, श्रीराम घुले सर, लक्ष्मण घुले सर, संदिपान गायकवाड सर, आघाव सर, सुधाकर ढाकणे सर, आसाराम चौरे, सोनवणे बाबा, वसंत डोईफोडे (फौजी), मयुर टकले, प्रभाकर शिंदे, पिटू भैया तांदळे, संदीप सोनवणे यांच्या सह शिक्षक कॉलनी भागातील नागरिक व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

केज येथे मा.आ.सौ. संगिताताई ठोंबरे व डॉ.सौ.प्रतिभाताई थोरात यांच्या वतीने स्नेहपूर्ण वातावरणात दिवाळी फराळ संपन्न; विविध क्षेत्रांतील मान्यवरांची मांदियाळी

केज/प्रतिनिधी

दिवाळी हा सण केवळ प्रकाशाचा नसून सामाजिक सलोखा, आपुलकी आणि स्नेहाचे प्रतीक आहे. याच भावनेतून केज शहरातील श्रेया हॉस्पिटल येथे शिवसेना पक्षाच्या वतीने रविवार,दि. ८ नोव्हेंबर रोजी भव्य दिवाळी फराळ व स्नेहसंमेलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला राजकीय, सामाजिक, शैक्षणिक,आरोग्य, आध्यात्मिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांनी उत्स्फूर्त उपस्थिती दर्शवून शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला शिवसेना उपनेत्या तथा माजी आमदारसौ.संगिताताई विजयप्रकाश ठोंबरे, शिवसेनेच्या महिला जिल्हाध्यक्षा डॉ.सौ. प्रतिभाताई अशोकराव थोरात आणि कामगार कल्याण आयुक्त डॉ. श्री.अशोकराव थोरात यांनी उपस्थित सर्व



मान्यवरांचे व नागरिकांचे आदरपूर्वक स्वागत केले.दिवाळी सणाच्या निमित्ताने श्रेया हॉस्पिटल परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.या स्नेह मेळाव्यात केवळ फराळाची मेजवानीच नव्हे,तर उपस्थितां साठी सूरसंगम ऑर्केस्ट्राच्या वतीने बहारदार संगीताचा सुरेल नजराणा सादर करण्यात आला.

उपस्थितांनी रुचकर फराळा सोबतच श्रवणीय संगीताचा मनमुराद आनंद लुटला.

यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे महाराष्ट्र संपर्क प्रमुख तथा दैनिक समर्थ राजयोगचे संपादक श्री.वैभव स्वामी सर, महिला जिल्हाध्यक्षा आयेशा शेख मडम यांच्या सह महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या केज तालुका कार्यकारिणीचे पदाधिकारी उपस्थित होते. विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या मान्यवरांच्या एकत्र येण्याने हा सोहळा केवळ औपचारिक न राहता विचारांची देवाणघेवाण आणि स्नेहबंध घट्ट करणारा ठरला. अशा सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमा तून समाजातील संवाद आणि आपुलकी वृद्धिंगत होते, अशी भावना यावेळी उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.कार्यक्रमात सर्व स्तरांतून आलेल्या नागरिकांनी आयोजकांचे आभार मानत दिवाळीच्या मंगलमय शुभेच्छा दिल्या.

जिल्हाधिकाऱ्यांची शेतकऱ्यांसोबत अनोखी दिवाळी! लोळदगावात सेंद्रिय शेती, गोशाळा आणि जलसंधारण प्रकल्पांची पाहणी

बीड / प्रतिनिधी

दिवाळीचा सण शेतकऱ्यांसोबत साजरा करण्याचा आगळावेगळा उपक्रम बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी रविवारी (दि. ८ नोव्हेंबर) लोळदगाव येथे राबविला. यावेळी त्यांनी बळीराजा कृषी विज्ञान मंडळाच्या सेंद्रिय व नैसर्गिक शेती प्रकल्पासह गोशाळा, कृषी प्रशिक्षण केंद्र आणि जलसंधारणाच्या कामांची पाहणी केली. शेतकऱ्यांसोबत दिवाळीचा फराळ करत त्यांच्या अडचणीही जाणून घेतल्या.

कृषी भूषण शिवराम घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या सेंद्रिय शेती, नैसर्गिक निविष्ठा, सेंद्रिय खतनिर्मिती आणि शेतकरी प्रशिक्षण उपक्रमांची जिल्हाधिकाऱ्यांनी माहिती घेतली. तसेच गिर गायींची गोशाळा, सीपीपी प्रकल्प, दहा ड्रम थिअरी आणि कंपोस्ट प्रकल्पाची पाहणी करून या उपक्रमांचे कौतुक केले. प्रशिक्षण केंद्रात लक्ष्मीपूजन करून शेतकऱ्यांसोबत दिवाळी साजरी केली.

दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांनी बिंदुसरा नदीवरील बंधारा, नदी खोलीकरण आणि ओढा खोलीकरणाच्या कामांचीही पाहणी केली. पावसाचे पाणी



अडविणे, जमिनीत मुरविणे आणि भूजल पातळी वाढविण्यासाठी ग्रामस्थांनी जलसंधारणाच्या कामांत सक्रिय सहभाग घ्यावा. जलतारा यांसारखे प्रकल्प राबवून पाण्याचा प्रत्येक थेंब जपावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून शेतीविषयक अडचणी, पाणी उपलब्धता, उत्पादन खर्च आणि भविष्यातील नियोजनाबाबत चर्चा केली. कृषी भूषण शिवराम घोडके यांच्या नैसर्गिक शेतीतील प्रयोगांचा परिसरातील शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असेही त्यांनी सांगितले.या दौऱ्यावेळी नायब तहसीलदार प्रशांत जाधवर, मंडळ अधिकारी जितेंद्र वाघ, कृषी अधिकारी बाळासाहेब आघाव, ग्रामविकास अधिकारी जाधव, कृषी भूषण शिवराम घोडके, गोरख भाऊ घोडके, सरपंच अजय घोडके, उपसरपंच विकास बाबू घोडके, बापू जिजा घोडके, गोरख बोंगाणे, श्रीराम घोडके, नीलकंठ घोडके, गणपत घोडके, रामेश्वर घोडके यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी शिवराम घोडके यांनी उपस्थितांचे आभार मानले.शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्यासोबत दिवाळी साजरी करण्याचा जिल्हाधिकाऱ्यांचा हा उपक्रम प्रशासन आणि शेतकरी यांच्यातील स्नेहबंध अधिक दृढ करणारा तसेच नैसर्गिक शेती व जलसंधारणासाठी प्रेरणादायी ठरला.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 (MAHARSHTRA).